# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२४

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक ०२ जुलै, २०२४ / आषाढ ११, १९४६ ( शके )**

## मुख्यमंत्री :- यांचे प्रभारी विभाग

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३०**

---

### महाड (जि. रायगड) येथील चवदार तळ्याचे सौंदर्यीकरण व जलशुद्धीकरणाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(१) * ८०५०८ श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्रीमती मंजुळा गावीत (साक्री), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड (जि.रायगड) येथील चवदार तळ्याची दुरवस्था झाली असून त्यातील पाणी पिण्यायोग्य राहण्यासाठी आवश्यक ती देखभाल न केल्यामुळे पाण्यावर शेवाळे साठून दुर्गंधी पसरल्याने पाणी प्रदुषित होऊन नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तळ्याकरिता लाखो रुपये खर्च करण्यात येऊनही चवदार तळ्याचे पाणी पिण्यायोग्य नसल्याने महाड नगरपरिषदेने चवदार तळे शुद्धीकरण व सौंदर्यीकरणाचा ६५ कोटी रुपयांचा सादर केलेला प्रस्ताव गेल्या ३ वर्षापासून शासनाकडे मंजूरीच्या प्रतिक्षेत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर तळ्याचे सौंदर्यीकरण व जलशुद्धीकरणाचे काम लवकरात लवकर सुरु होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) महाड नगरपरिषदेच्या हद्दीतील चवदार तळयातील पाणी शुध्दीकरणासाठी मे.ऑरगॅनिक बायोटेक प्रा.लि.मुंबई यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांचेमार्फत दरमहा मायक्रोबाएबल कल्चरचे मिश्रण तलावात सोडून त्याद्वारे पाणी शुध्द ठेवण्याचा प्रयत्न केला जात आहे. तथापि, या पध्दतीने पाणी पिण्यायोग्य राहत नसल्याने पंजाब राज्यातील अमृतसर येथील सुवर्ण मंदिराच्या धर्तीवर ओझोन प्रक्रिया करुन चवदार तळे सौंदर्यीकरण व जलशुध्दीकरणाचा रु.६५.५२ कोटी रकमेचा सविस्तर प्रकल्प अहवाल सहायक आयुक्त, समाज कल्याण, रायगड यांचेकडे सादर केला आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने काही मुद्दयांची पुर्तता करण्याच्या सूचना त्यांचेकडून प्राप्त झाल्या असून त्याची पुर्तता नगरपरिषदेकडून करण्यात येत आहे.

(३) महाड शहरातील चवदार तळयास राष्ट्रीय स्मारकाचा दर्जा असून त्याची देखभाल व दुरुस्ती नगरपरिषदेच्या स्वनिधीतून व शासनाच्या विविध योजनेअंतर्गत प्राप्त अनुदानातून करण्यात येते. नगरपरिषदेने चवदार तळयाचे सुशोभिकरण करण्यासाठी तयार केलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालास समाजकल्याण विभागाकडून मान्यता प्राप्त झाल्यानंतर तळे व आजूबाजूच्या परिसराचे सौंदर्यीकरण करण्याचे नगरपरिषदेचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील एसटी कर्मचाऱ्यांच्या मागण्या प्रलंबित असल्याबाबत

**(२) * ८०३६५ श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील एसटी कर्मचाऱ्यांना महागाई भत्ता, घरभाडे भत्ता, वेळेत वेतन मिळावे, वार्षिक वेतनवाढीचा वाढीव दर व थकबाकी मिळावी इत्यादी मागण्यांसाठी एसटी कर्मचाऱ्यांनी दिनांक १३ फेब्रुवारी, २०२४ रोजी वा त्यासुमारास राज्यातील सर्व विभागीय कार्यालयासमोर उपोषण, आंदोलन सुरु केले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एसटी कर्मचाऱ्यांची वेतनवाढ माहे मार्च, २०२३ पासून प्रलंबित असून माहे नोव्हेंबर, २०२१ मध्ये सेवा ज्येष्ठता न पाळता अनुक्रमे पाच हजार, चार हजार व अडीच हजार रुपये अशी वेतनवाढ करण्यात आल्यामुळे वेतनात विसंगती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कर्मचाऱ्यांचे आर्थिक प्रश्न, वेतनवाढीतील त्रुटी व शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे महागाई भत्ता अशा विविध समस्या सोडविण्यासाठी शासनाने दिनांक ४ ऑक्टोबर, २०२३ रोजी त्रिसदस्यीय समिती नेमून कर्मचाऱ्यांच्या समस्याच्या निराकरणासाठी दोन महिन्याचा कालावधी दिला होता, परंतु सदर कालावधी संपूनही सद्य:स्थितीत एसटी कर्मचाऱ्यांचे विविध आर्थिक प्रश्न प्रलंबित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन एसटी कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्या पूर्ण करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) महाराष्ट्र स्टेट ट्रान्सपोर्ट कामगार संघटनेने प्रलंबित आर्थिक मागण्यांबाबत दि. ०५.०२.२०२४ रोजी रा.प. प्रशासनास नोटीस देवून दि.१३.०२.२०२४ पासून रा.प.महामंडळाच्या विभागीय कार्यालयासमोर उपोषण सुरु केले होते. तदनंतर मा.मंत्री उद्योग, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली दि.२७.०२.२०२४ रोजी झालेल्या बैठकीमध्ये झालेल्या चर्चेअंती सदर संघटनेने सदरचे उपोषण मागे घेतले आहे.
(२) कर्मचाऱ्यांची वेतनवाढ प्रलंबित नाही. केवळ वेतनवाढीमुळे वेतनात विसंगती झाल्याचे दिसून येत नाही.
(३), (४) व (५) कर्मचाऱ्यांचे आर्थिक प्रश्न सोडविण्याबाबत समिती नेमण्यात आली असून, समितीच्या दोन बैठक पार पडलेल्या आहेत.

-----------------

## मुंबईतील लोकमान्य टिळक रूग्णालयाची (शीव) जागा पुनर्विकासाच्या नावाखाली विकासकाला दिल्याबाबत

**(३) * ७९५८९ श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिकेच्या लोकमान्य टिळक (शीव) रुग्णालयाच्या नावावर असलेल्या जागेचे नवीन प्रॉपर्टी कार्ड बनवून सदरहू जागा पुनर्विकास प्रकल्पाच्या नावाखाली विकासक कंपनीला दिल्याचे शीव रुग्णालय बचाव समितीने दिनांक २४ जानेवारी, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आणले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे मुंबई महानगरपालिकेचे जवळपास पाच हजार कोटी रुपयांचे नुकसान होणार असून रुग्णालयात येणारे नागरिक आरोग्य सेवेपासून देखील वंचित राहणार असल्याचा आरोपही समितीने केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

सदर पुनर्विकास प्रकल्पात बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एफ/उत्तर विभागातील सायन विभागाच्या भुकर क्र.६(भाग) ७ व ४१ भाग यांचा समावेश असून सदर भुकर क्रमांक हे बृहन्मुंबई महानगरपालिका (“Municipal Corporation of Greater Mumbai”) यांच्याच नावावर आहेत.

सदर भुखंडाची स्वतंत्र मिळकत पत्रिका उघडण्याकरिता विकासक कंपनीला कोणतेही ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आलेले नाही.

(२) हे खरे आहे.

तथापि, सदर पुनर्विकास प्रकल्पात राहत प्लाझा को. हॉ. सो. (प्र), माटुंगा, सिंधी कॉलनी पंचायत को. हॉ. सो. (प्र) व न्यु. सुंदर कमलानगर एस.आर.ए. को. हॉ. सो. (प्र) ह्या सोसायटींचा समावेश आहे. सदर तिन्ही पुनर्विकास प्रकल्प एकत्रितरित्या विकसित केल्यास सुयोग्य पध्दतीने नियोजन करणे शक्य आहे. तसेच, महापालिकेस एकाच ठिकाणी ११९५७.५८ चौ.मी. विकसित मनोरंजन मैदान/उद्यान, १४९ महानगरपालिका कर्मचारी निवासस्थाने व महानगरपालिका गृहनिर्माणाकरिता २१७२.९० चौ.मी. क्षेत्राचे बांधिव क्षेत्र उपलब्ध होणार आहे. याशिवाय महानगरपालिकेस एकूण भांडवली मुल्य रु.५३२.५५ कोटी व जमीन अधिमुल्य रु.२९.८५ कोटी प्राप्त होणार आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सावेडी (जि.अहमदनगर) येथील साई मिडास इम्पेरियल टॉवर्स कंपनीच्या संचालकांनी केलेला गैरव्यवहार

**(४) * ८१५६० श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावेडी (जि.अहमदनगर) येथील साई मिडास इम्पेरियल टॉवर्स कंपनीच्या संचालकांनी ४ कोटी ७२ लाख रुपये इतक्या रकमेच्या बनावट पावत्या व खोटे प्रमाणपत्र तयार करून अहमदनगर महानगरपालिकेकडे भरणा केल्याचे दाखवून बांधकाम पूर्णत्वाचा दाखला मिळविला असल्याचे महानगरपालिकेच्या सहायक संचालक, नगररचनाकार यांनी त्यांच्या जावक क्रमांक १४९, दिनांक १९ एप्रिल, २०२४ च्या पत्रात मान्य केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी कंपनीच्या संचालक व मालकांवर गुन्हे दाखल करण्याबाबत गालिब अली व इतर अनेक नागरिकांनी तक्रार अर्ज सादर करुन आंदोलनाचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करून कंपनीचे संचालक व मालक तसेच संबंधित अधिकारी यांचेविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय.

साई मिडास इम्पेरिअल टॉवर्स चे आर्कीटेक्ट यांनी भोगवटा प्रमाणपत्राचा ऑनलाईन प्रस्ताव हा महानगरपालिकेकडे विहीत नमुन्यामध्ये Appendix-G सह सादर केला होता त्यामध्ये सर्व शुल्क जमा केल्याचे नमूद करण्यात आलेले होते. अर्जदाराने नमूद केल्यानुसार सर्व शुल्क महानगरपालिकेकडे जमा झाल्याबाबत शहानिशा व खात्री न करताच अर्जदारास दि.१२.१०.२०२३ रोजी भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे. उक्त भोगवटा प्रमाणपत्र देण्यापुर्वी महानगरपालिकेकडून प्रकरणी आवश्यक ती तांत्रिक छाननी करणे तसेच आवश्यक अधिमुल्य शुल्क हे महानगरपालिकेकडे जमा झाल्याची खातरजमा न करता केवळ वास्तुविशारद यांनी ऑनलाईन सादर केलेल्या Appendix G मध्ये नमूद केलेल्या बाबींवर विसंबून प्रकरणी अहमदनगर महानगरपालिकेकडून भोगवटा प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही सुसंगत वाटत नाही.

(२) होय.

श्री. सय्यद गालीब अली सय्यद साबीर यांनी सहायक संचालक, नगर रचना, अहमदनगर महानगरपालिका यांचेकडे दि.२९.०२.२०२४ रोजी दाखल तक्रार अर्ज व त्यावर दि.२९.०५.२०२४ रोजी दिलेल्या स्मरणपत्रकाच्या अनुषंगाने महानगरपालिकेने दि.३०.०५.२०२४ च्या पत्रान्वये तक्रार निकाली काढण्यात आलेली आहे.

(३) व (४) सदर प्रकरणी आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) (MCR) मधील तरतुदीनुसार महानगरपालिकेचे सहाय्यक संचालक, नगररचना यांना जा.क्र.११२१, दि.१९.०४.२०२४ अन्वये व महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ नुसार जागा मालक यांना जा.क्र.१०, दि.२०.०५.२०२४ तसेच संबंधित आर्किटेक्ट श्री.मयुर कोठारी यांना जा.क्र.०९, दि.२०.०५.२०२४ अन्वये कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आलेली असुन त्याचा खुलासा प्राप्त झाल्यावर महानगरपालिकेकडून कार्यवाही करण्याची तजवीज ठेवण्यात आलेली आहे. संबधित सहायक संचालक, नगर रचना, अहमदनगर महानगरपालिका यांनी प्रकरण तपासणीत हलगर्जीपणा केलेला आहे.

शासन स्तरावरून देखील कारणे दाखवा नोटीस बजाविण्याची कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पी-उत्तर विभागातील प्रभारी वसाहत अधिकारी यांनी केलेल्या गैरकारभाराबाबत

**(५)** * **८१९९० श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पी-उत्तर, मालाड (पश्चिम) मुंबई विभागात दिनांक १६ फेब्रुवारी, २०२३ पासून प्रभारी वसाहत अधिकारी म्हणून पदाचा कार्यभार घेताच श्रीमती नेहा दुबे यांनी मालाड (पश्चिम) अंतर्गत असणाऱ्या वळणई परिवर्तन एस.आर.ए. सहकारी गृहनिर्माण संस्था व अन्य काही झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील विकासकासमवेत संगनमताने गैरकारभार केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील परिशिष्ट-२ मध्ये श्रीमती दुबे यांनी श्रीमती दर्पणा राणे या विकासकाच्या खासगी व्यक्तीची बेकायदेशीररित्या नियुक्ती करुन नियमबाह्य कामे केल्याने, श्रीमती नेहा दुबे यांची सखोल चौकशी करुन त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी मागणी मा.मुख्यमंत्री महोदय यांचेकडे दिनांक १२ डिसेंबर, २०२३ रोजी वा त्यादरम्यान निवेदनान्वये केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निवेदनातील तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने दिनांक ८ जानेवारी, २०२४ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांना नियमानुसार तपासून तात्काळ कार्यवाही करावी असे स्पष्ट निर्देशही देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू निवेदनांच्या अनुषंगाने शासनाने संबंधित अधिकाऱ्यांची सखोल चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली आहे वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) हे खरे आहे.
(४) सदर प्रकरणी मा.लोकप्रतिनिधींनी केलेल्या तक्रारींच्या अनुषंगाने तक्रारींची शहानिशा करुन बृहन्मुंबई महानगरपालिकेद्वारे त्यांना दिनांक १४.०५.२०२४ रोजी मुद्देसूद अहवाल पाठविण्यात आला आहे. त्यानुसार तक्रारीत नमूद केलेल्या श्रीमती दर्पणा राणे यांची नियुक्ती महानगरपालिकेमार्फत झालेली नसून त्या महानगरपालिकेच्या वतीने महानगरपालिकेत कार्यरत नाहीत.

मा.लोकप्रतिनिधींच्या तक्रार पत्रात नमूद केलेल्या वळणाई परिवर्तन एस.आर.ए. सहकारी गृहनिर्माण संस्थेकरिताच्या योजनेत दिनांक १५.०५.२०२४ रोजी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत नावे समाविष्ट करणेबाबत प्राप्त पत्रान्वये व झोपडीधारकांनी सादर केलेल्या विविध कागदपत्रांची संबंधित प्राधिकरणांकडून पडताळणी केल्यानंतर पुरवणी परिशिष्ट-२ तयार करुन ते दिनांक १४.०९.२०२३ रोजी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास पाठविण्यात आले होते. सबब सदर प्रकरणात कोणतीही दिरंगाई झाल्याचे दिसून येत नाही.

त्याचप्रमाणे, मा.लोकप्रतिनिधींच्या तक्रार पत्रात नमूद केलेल्या सीटीएस क्र. ३०७/६६-अ वरील डॉ. मुत्तुमारी नगर, रामचंद्र लेन, काचपाडा, मालाड (प.) येथील योजनेत संस्थेने दाखल केलेल्या याचिका क्र. १०१४/२०१८ मध्ये एकूण १४९ बांधकामांचा उल्लेख दिसून येतो. तथापि दिनांक ०३.०८.२०२२ व दिनांक ०४.०८.२०२२ रोजीच्या मा. उच्च न्यायालयाच्या आदेशांन्वये सदर ठिकाणी असलेल्या झोपड्यांचे सर्वेक्षण करण्यात आले होते. सदर सर्वेक्षणात आढळलेल्या ११८ झोपडीधारकांनी सादर केलेले वास्तव्याचे पुरावे पडताळणीकरिता संबंधित प्राधिकरणांना पाठविण्यात आलेले आहेत. सदर पडताळणी अहवालासापेक्ष पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच सदर प्रकरणी दिनांक १०.०१.२०२३ व दिनांक १२.०४.२०२४ रोजी मा.उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये निष्कासनास मनाई असलेल्या सोडून अस्तित्वात असलेल्या उर्वरित १२ ते १५ कच्च्या झोपड्या व ८८ अनधिकृत झोपड्यांचे निष्कासन करण्यात आले आहे.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, प्रस्तुत प्रकरणी कोणताही गैरकारभार झाल्याचे दिसून येत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नांदुरा (जि. बुलढाणा) शहरात घाणीचे साम्राज्य निर्माण झाल्याबाबत

**(६) * ८०९९९ श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदुरा (जि. बुलढाणा) नगरपालिकेत घनकचरा व्यवस्थापनाचे कंत्राट फेरण या संस्थेला देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, घनकचरा व्यवस्थापनासाठी वर्षाला सुमारे ९६ लक्ष रुपये खर्च करुनही संस्थेने आपल्या कामामध्ये कसूर केल्याने नांदुरा शहरामध्ये ठिक-ठिकाणी घाणीचे साम्राज्य पसरलेले असल्याचे दिनांक २२ एप्रिल, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, स्वच्छतेअभावी शहरात नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत सदर संस्थेचे कंत्राट रद्द करुन मुख्याधिकारी यांचेवर कारवाई करण्याची मागणी स्थानिकांकडून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणी सखोल चौकशी करुन संबंधित कंत्राटदार व जबाबदार अधिकारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे अशंत: खरे आहे.

सदर कंत्राटदारास घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत नांदुरा शहरातील घरोघरी कचरा संकलन व वाहतूक करणे, याबाबतचे कंत्राट देण्यात आले आहे.

(२) अंशत: खरे आहे.

या कंत्राटदारास माहे ऑगस्ट, २०२३ ते माहे मार्च, २०२४ या ८ महिन्याच्या कालावधीसाठी रुपये ६०.४८ लाख किमतीचे कंत्राट देण्यात आले होते.

नगरपरिषदेने दिनांक १/३/२०२४ रोजी ठराव क्रमांक ४२/०१ पारित करुन सन २०२४-२०२५ या वित्तीय वर्षाकरीता निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत सदर कंत्राटदारास मुदतवाढ दिली आहे.

तथापि, माहे एप्रिल, २०२४ मध्ये कंत्राटदाराने शहरातील काही भागातील कचरा संकलन व वाहतुक केली नसल्याची तक्रार प्राप्त झाली.

(३), (४) व (५) हे खरे नाही.

कंत्राटदारासमवेत दिनांक २७/७/२०२३ रोजी केलेल्या करारातील अटी व शर्तीनुसार मार्च, २०२४ या महिन्याकरीता कंत्राटदारास रुपये २५,०००/- इतका दंड करण्यात आला आहे. तसेच एप्रिल, २०२४ करीता त्यांना अनुज्ञेय असलेल्या देयकातून रुपये २५,०००/- इतकी दंडाची रक्कम आकारण्याची नगरपरिषदेकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) महानगरपालिकेच्या अखत्यारीतील राजश्री शाहू उद्यान पुनर्विकासाच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(७) * ७९९७५ श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक दहा येथील शाहूनगर मधील राजश्री शाहू उद्यान पुनर्विकासाच्या कामात निविदेप्रमाणे काम न करता सल्लागार, श्री.ए.आर.हार्दिक व श्री.के.पांचाळ यांनी संगनमताने कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याबाबतची पुराव्यासहित तक्रार सामाजिक कार्यकर्ते व नगरसेवक यांनी महानगरपालिका प्रशासनाकडे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच सल्लागाराच्या मोठ्या भावाला अटी व शर्तींची पूर्तता न करता निविदा मूल्यापेक्षा चार टक्के कमी दराने निविदा देण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच पुनर्विकासाच्या निविदेतील अटी शर्तीनुसार काम न करता व समाविष्ट २१ बाबींपैकी १० बाबी पूर्ण केल्या नसतानाही कंत्राटदाराला संपूर्ण रक्कम अदा करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने उच्चस्तरीय चौकशी करुन दोषी कंत्राटदार व सल्लागार यांच्यावर गुन्हा दाखल करुन काळया यादीत टाकणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, या प्रकरणातील संबंधित दोषी अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) सदर कामाबाबत माजी नगरसेवक यांनी माहे मार्च, २०२४ मध्ये महानगरपालिकेकडे तक्रार दाखल केली आहे, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) सदर तक्रारीच्या अनुषंगाने मनपाच्या दक्षता विभागामार्फत पडताळणी करण्यात येत आहे.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मानखुर्द – बेलापूर रेल्वे प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांना घरे देण्याबाबत**

**(८) * ८०२८४ श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्रीमती ऋतुजा लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मानखुर्द–बेलापूर रेल्वे प्रकल्पातील सुमारे १७० प्रकल्पग्रस्तांना घरे देण्याबाबत राज्य शासनाने आदेश देऊनही फक्त ४१ भुमिपुत्रांना घरे देण्यात आली असून उर्वरीत भुमिपुत्रांना घरे न देता बोगस नावांचा समावेश करुन इतरांना घरे वाटप केली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करुन उर्वरीत भुमिपुत्रांना घरे देण्याची मागणी उक्त प्रकल्पग्रस्तांनी सिडकोकडे दिनांक १५ जानेवारी, २०२४ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने प्रकल्पग्रस्तांना घरे देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) सिडको महामंडळाच्या जागेवर अनधिकृतपणे वास्तव्यास असलेली मानखुर्द-बेलापूर रेल्वे मार्गावरील सानपाडा येथील दत्तगुरुनगर झोपडपट्टी दि.१७.५.१९९४ रोजी निष्कासित करण्यात आली होती. सदर झोपडपट्टीधारकास सिडको संचालक मंडळाच्या ठराव क्र.८८०५, दि.१३.८.२००३ व ठराव क्र.१०२२०, दि.२३.११.२००९ अन्वये २५ चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड विहित दराने देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

दरम्यान दत्तगुरुनगर सानपाडा प्रकल्पग्रस्त यांचे प्रवर्तकातर्फे मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या रिट याचिका क्र.६६३४/२०१२ मधील दि.२३.७.२०१२ च्या आदेशाच्या अनुषंगाने तत्कालीन प्रधान सचिव (नवि-१) यांनी सुनावणी घेऊन अंतिम आदेश दि.१४.५.२०१३ रोजी निर्गमित करण्यात आले आहेत.

सद्यस्थितीत, प्रस्तुत प्रकरणी उपरोक्त आदेशाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने प्रधान सचिव (नवि-१) यांचेकडे प्रकल्पग्रस्तांसोबत बैठक दि.२४.११.२०२३ रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये मानखुर्द-बेलापूर रेल्वे प्रकल्पातील एकूण १७० विस्थापितांच्या यादीपैकी उर्वरित ४५ विस्थापितांची यादी अंतिम करण्यासाठी संबंधितांना सिडकोने नोटीस देऊन कागदपत्रांची तपासणी करून उर्वरित पात्रताधारक /

विस्थापितांची यादी निश्चित करण्याचे निर्देश सिडको महामंडळास देण्यात आले होते त्यानुषंगाने सिडको महामंडळाने कागदपत्रे सादर करण्यासाठी जाहीर सूचना दि.१३.१२.२०२३, दि.४.१.२०२४ व दि.२४.२.२०२४ रोजी प्रसिद्ध केल्या आहेत. त्यास अनुसरून सादर केलेल्या कागदपत्रांची सिडको महामंडळाच्या स्तरावर छाननी सुरू असून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. याप्रकरणी अद्यापि विस्थापित प्रकल्पग्रस्तांना भूखंडाचे वाटप करण्यात आलेले नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील भायखळा येथील वीरमाता जीजाबाई भोसले उद्यानात पक्षी व प्राण्यांचा झालेला मृत्यू

**(९) * ७९४१६ श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्रीमती मंजुळा गावीत (साक्री), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील भायखळा येथील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या 'वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान आणि प्राणी संग्रहालयात' (राणीची बाग) दिनांक १ एप्रिल, २०२२ ते ३० एप्रिल, २०२४ या कालावधीत ४७ प्राण्यांचा मृत्यू झाला असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्राणी संग्रहालयात पक्षी व प्राण्यांच्या आहार व आरोग्याकडे यंत्रणेचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींवर कारवाई करणेबाबत तसेच प्राणी व पक्ष्यांचे होणारे मृत्यू रोखण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

भायखळा येथील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान आणि प्राणी संग्रहालयात' (राणीची बाग) येथे माहे एप्रिल, २०२२ ते एप्रिल, २०२४ या कालावधीत ७१ प्राणी-पक्ष्यांचे वृध्दापकाळ, रक्तस्त्राव, संसर्ग, तणाव यांमुळे मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सदर प्राणी संग्रहालयातील प्राण्यांना त्यांच्या विहित खाद्यतक्त्यानुसार नियमित योग्य सकस आहार पुरविला जात असून, त्यांच्या आरोग्यविषयक देखभालीकरिता तेथे पूर्णवेळ पशुवैद्यकीय डॉक्टर नेमण्यात आले आहेत.

केंद्रीय प्राणी संग्रहालय प्राधिकरण, नवी दिल्ली यांच्याकडील मानकांनुसार प्राणी संग्रहालयातील सर्व वन्यप्राणी-पक्ष्यांच्या आरोग्याची नियमित तपासणी, लसीकरण, औषधोपचार, निर्जंतुकीकरण, उपचार, नियमित आहार इत्यादी बाबींची सदर प्राणी संग्रहालयातील पशुवैद्यकांमार्फत वेळोवेळी पूर्तता करण्यात येते. प्राणी-पक्ष्यांच्या देखभालीमध्ये सदर प्राणीसंग्रहालय यंत्रणेकडून कोणत्याही प्रकारचे दुर्लक्ष झालेले नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात प्लास्टिक कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावणे व पुर्नप्रक्रिया करण्याबाबत**

**(१०) * ८०६५५ श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात प्लास्टिक वापरावर कोणतेही नियंत्रण नसून प्लास्टिकमुळे होणाऱ्या प्रदुषणात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्लास्टिक पॅकेजिंग उत्पादक, आयातदार, ब्रँड मालक, प्लास्टिक कचरा पुर्नप्रक्रिया उद्योगधंदे करणाऱ्यांना प्लास्टिकचे किती उत्पादन केले, बाजारपेठेत किती प्लास्टिक दिले यासोबतच प्लास्टिकची शासनाने विहित केलेल्या शास्त्रोक्त पध्दतीने किती विल्हेवाट लावली याबाबत माहिती देण्याचे बंधनकारक करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात प्लास्टिक प्रदूषण वाढल्यामुळे पर्यावरणीय नियमांचे उल्लंघन करून प्लास्टिक उत्पादन केल्यास नुकसान भरपाई सह उद्योगधंदे बंद करण्याचा इशारा प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, केंद्रीय आणि राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या पोर्टलवर सदर नोंदणी करताना शास्त्रोक्त पध्दतीने प्लास्टिक कचऱ्याची विल्हेवाट लावणे, पुर्नप्रक्रिया करणे याच्या अंमलबजावणी संदर्भात शासनस्तरावर कोणती पडताळणी व कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्लास्टिकमुळे होणारे प्रदूषण रोखण्यासंदर्भात तसेच याचे उल्लंघन करणाऱ्या संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार (MoEFCC) यांनी दिनांक १६ फेब्रुवारी, २०२२ रोजी प्लास्टिक कचरा व्यवस्थापन (PWM) नियमांमध्ये चौथ्या दुरुस्तीनुसार प्लास्टिक पॅकेजिंगसाठी विस्तारित उत्पादक जबाबदारी नुसार (EPR) अधिसूचित मार्गदर्शक तत्त्वे उत्पादक, आयातदार आणि ब्रँड-मालक (PIBOs) आणि प्लास्टिक कचरा पुनर्प्रक्रिया उद्योग (PWPs) यांचेसाठी निश्चित केलीली आहेत. सादर अधिसूचित (ईपीआर) मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यांचे ईपीआर दायित्व पूर्ण करण्यासाठी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने (CPCB) विकसित केलेल्या केंद्रीकृत ईपीआर पोर्टलवर नोंदणी करणे आवश्यक आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) नोंदणीसाठी उद्योगांना ईपीआर पोर्टल दि.०५ एप्रिल, २०२२ रोजी सुरु करण्यात आले आहे. तथापि, नोंदणी न करता उद्योग चालवत असल्यास पर्यावरण (संरक्षण कायदा), १९८६ अंतर्गत कारवाई करण्याची जाहीर सुचना स्थानिक दैनिक वृत्तपत्रात दि.०९ एप्रिल, २०२४ रोजी मराठी व इंग्रजी भाषेतुन प्रसिध्द करण्यात आली होती. तसेच, सन २०२३-२४ मध्ये एकुण ४ उद्योगांवर पर्यावरणीय नियमांचे उल्लंघन केल्यामुळे उत्पादन बंद करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

(५) स्थानिक स्वराज्य संस्था, पोलीस विभाग महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या संयुक्त पथकामार्फत वेळोवेळी आस्थापनांना भेटी देण्यात येतात व एकल वापर प्लास्टिकच्या वस्तुंचे उत्पादन, वापर, विक्री, वाहतूक, हाताळणी आणि साठवणूक करणाऱ्या आस्थापनांवर कारवाई करण्यात येते. सन २०२३-२४ मध्ये एकूण १७८७५० आस्थापनानां भेटी देण्यात आल्या त्यापैकी ८३३१ आस्थापनेवर कारवाई करण्यात आली व रु. ४.५ कोटी इतका दंड गोळा करण्यात आला तसेच १९१ टन प्रतिबंधित प्लास्टिक जप्त करण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तारापूर (जि.पालघर) औद्योगिक क्षेत्रातील प्रदूषण रोखण्याबाबत

**(११) * ७९९२४ श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तारापूर (जि.पालघर) औद्योगिक क्षेत्रात जवळजवळ २०० रासायनिक कारखाने असून तेथील काही कारखान्यांकडून घनकचऱ्याची विल्हेवाट योग्य रितीने न करणे तसेच कारखान्यातील सांडपाणी कोणतीही प्रक्रिया न करता खाडी व समुद्रात सोडण्यात येत असल्याने फार मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच बोईसर परिसरात कारखान्यातून सोडण्यात येणाऱ्या सांडपाण्यामुळे नैसर्गिक नाले नष्ट होत असून त्यावर अतिक्रमण केले जात आहे तसेच शिगाव परिसरात दुषित पाण्यामुळे नाल्यामधील पाणी प्रदुषित होऊन मासे व इतर जलचर नष्ट झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कारखान्यांमधून निघणारा घनकचरा विल्हेवाटीसाठी तळोजा येथील मुंबई वेस्ट मॅनेजमेंट कंपनीमध्ये पाठविण्यात येतो मात्र वाहतुकीसाठी मोठ्या प्रमाणात खर्च येत असल्याने काही कारखाने बेकायदेशिररित्या कचऱ्याची विल्हेवाट लावतात, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कारखान्यातील सांडपाणी प्रक्रिया केंद्राच्या देखभाल दुरुस्तीचा खर्च कारखान्याच्या आवाक्या बाहेरचा असल्याने तेथील सांडपाणी प्रक्रिया केंद्र बंद ठेवण्यात येतात, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या कारखान्यामधील दुषीत सांडपाणी ७ कि. मी. खोल समुद्रात पाईपलाईनद्वारे सोडावे असे आदेश असताना प्रत्यक्षात २०० फूट अंतरावर एमआयडीसीने टाकलेली पाईपलाईन अदयाप कार्यान्वीत होऊ न शकल्याने मच्छिमार कृती समितीतर्फे मा.मुख्यमंत्री व संबंधित मंत्री महोदयांनी या प्रकरणाची तातडीने चौकशी करुन दोषीविरुद्ध कारवाई करण्याबाबत लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित कारखाने व दोषी अधिकारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे अंशत: खरे आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या वसाहतीच्या बाहेरील काही ठिकाणी घनकचरा टाकल्याच्या दोन घटना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निदर्शनास आलेल्या आहेत.

(४) हे खरे नाही.

(५) हे खरे नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मिरा-भाईंदर (जि.ठाणे) महानगरपालिकेने कचरा संकलन व वाहतूकीसाठी नियुक्त केलेल्या दोन कंत्राटदारांच्या निविदा प्रक्रियेत झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(१२) * ७९५२३ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरा-भाईंदर (जि.ठाणे) महानगरपालिकेने शहरातील सर्व प्रभागांमधून दैनंदिन साफसफाई, कचरा संकलन व वाहतूकीसाठी नियुक्त केलेल्या दोन कंत्राटदारांच्या निविदा प्रक्रियेत सुमारे ५०० कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे माहे जानेवारी, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी ठेकेदारांशी संगनमत करून निविदा मंजूर करताना मानक कार्यपद्धतीचा अवलंब न करता नियमबाह्य पद्धतीने निविदा काढून हे दोनच कंत्राटदार पात्र ठरतील अश्या पद्धतीने निविदेच्या अटी व शर्ती निश्चित करण्यात आल्या, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दोन्ही ठेकेदारांना फायदा देण्याच्या हेतूने महानगरपालिका अधिकाऱ्यांनी नियमबाह्यरित्या निविदेचे अंदाजपत्रक वाढवून घेतल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने यास जबाबदार असणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करुन दोन्ही ठेकेदारांना दिलेले कार्यादेश तातडीने रद्द करुन नव्याने निविदा प्रक्रिया राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) अशा आशयाची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधीकडून महानगरपालिका प्रशासनास प्राप्त झाली, हि वस्तुस्थिती आहे.
(२) हे खरे नाही.

निविदा अटीशर्ती तयार करतांना जास्तीत जास्त निविदाधारक यांना सहभाग घेता यावा यादृष्टीने या संदर्भात केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार निविदा अटी व शर्ती निश्चित करण्यात आलेल्या आहेत.
(३) व (४) हे खरे नाही, महानगरपालिका प्रशासनाने सदर कामाचे निविदा अंदाजपत्रक तयार करताना कामगारांचे किमान वेतनानुसार वेतन, आवश्यक इतर भत्ते, बोनस, सुरक्षा विषयक साहित्य, गणवेश इत्यादी बाबी विचारत घेऊन अंदाजपत्रक तयार केले आहे.

तसेच सदर अंदाजपत्रकास सक्षम प्राधीकरण्याच्या तांत्रिक मंजूरी नंतर निविदेप्रक्रियेअंती न्यूनतम निविदाधारका समवेत वाटाघाटी अंती दर निश्चित करुन न्यूनतम निविदाधारकास कार्यादेश देण्यात आलेले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात विशेष मुलांच्या शाळांना वसतिगृह व इतर संबंधित सेवांकरितांचे अनुदान मिळत नसल्याबाबत

**(१३) * ८१२८२ श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.नारायण कुचे (बदनापूर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेष तसेच दिव्यांग मुलांच्या शाळा, वसतिगृह व इतर संबंधित सेवांकरिताचे अनुदान शासनाकडून अद्यापही अप्राप्त असल्याने शाळा व वसतिगृहांकडे शासनाचे दुर्लक्ष होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यामध्ये अनेक शिक्षण संस्थाद्वारे विशेष मुलांसाठी शाळा संचलित केल्या जात असुन दिव्यांग कायद्यानुसार या शाळांना वसतिगृह व इतर संबंधित सेवांसाठी अनुदान देणे आवश्यक असतानाही शासनाने यासंदर्भात अद्याप धोरण लागू केले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात काही शिक्षण संस्थांनी दाखल केलेल्या याचिकेच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिनांक २ सप्टेंबर, २०१३ रोजी आणि नागपूर खंडपीठाने सन २०१९ व २०२१ मध्ये याबाबत समान धोरण सहा महिन्यात लागू करण्याचे आदेश देवूनही याची अद्यापही अंमलबजावणी झाली नाही, हे खरे आहे काय,

(४) तसेच राज्यातील दिव्यांगाच्या शाळा व वसतीगृहात कार्यरत अधीक्षक व गृहपाल यांना ७ वा वेतन आयोग लागू करणेबाबतचा अहवाल मा. आयुक्त, दिव्यांग कल्याण यांनी शासनास दिनांक २ मार्च, २०२२ रोजी सादर केलेला असून शासन स्तरावर प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणांची शासनाने चौकशी करुन विशेष व दिव्यांग मुलांच्या शाळा व वसतिगृहांना तातडीने अनुदान देणेबाबत तसेच तेथील कार्यरत कर्मचाऱ्यांना ७ वा वेतन आयोग लागू करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

राज्यातील अनुदानित दिव्यांगांच्या विशेष शाळा / कर्मशाळा / मतिमंद बालगृहे इत्यादी उपक्रमांना सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात रु.८२३,१३,३०,२७०/- इतके वेतन अनुदान व रु.४१,१५,१७,८५८/- इतके वेतनेतर अनुदान वितरीत करण्यात आलेले आहे.
(२) व (३) हे खरे आहे.

मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचे रिट याचिका क्र.१०१८०/२०१२ (ग्रामीण श्रमिक प्रतिष्ठान विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर) मधील मा. न्यायालयाच्या दिनांक २ सप्टेंबर, २०१३ च्या एकतर्फी आदेशान्वये दिव्यांगांच्या निवासी कार्यशाळेच्या धोरणाशिवाय अनिवासी करण्याच्या प्रकरणात अशा शाळांना द्यावयाच्या अनुदानांबाबत धोरण तयार करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच मा.उच्च न्यायालय, खंडपीठ नागपुर यांचे रिट याचिका क्र.३०५१/२०१९ (खटेश्वर मागासवर्गीय बहुउद्देशीय व्यावसायिक शिक्षण संस्था विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर) मधील मा. न्यायालयाच्या दिनांक ६ सप्टेंबर, २०२१ च्या आदेशान्वये स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या दिव्यांगांच्या विनाअनुदानित/ कायम विनाअनुदानित विशेष शाळांना अनुदान देण्याचे कायमस्वरुपी धोरण ६ महिन्याच्या मुदतीत तयार करण्याचे निदेश देण्यात आले आहेत.

त्यानुषंगाने दिव्यांगांच्या विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित विशेष शाळा, कर्मशाळा (प्रशिक्षण केंद्र) आणि अनाथ मतिमंद बालगृहे यांना मंजूर करावयाच्या अनुदानासंबंधी/ अनुदान तत्वावर आणण्यासाठी मान्यतेबाबत धोरणाचा मसूदा शासनस्तरावर तयार करुन त्यास नियोजन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, कौशल्य विकास व उद्योजकता विकास विभाग, अल्पसंख्यांक विकास विभाग व आदिवासी विकास विभागाचे अभिप्राय घेऊन वित्त विभागामार्फत मा.मंत्रीमंडळाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे.
(४) हे खरे नाही.

राज्यातील दिव्यांगांच्या शाळा कर्मशाळेवरील कार्यरत वसतीगृह अधीक्षक, गृहपाल यांचे वेतनश्रेणीत सुधारणा करणेबाबतचा प्रस्ताव राज्य वेतन सुधारणा समितीपुढे सादर केला होता. वित्त विभागाने दि.१३.०२.२०२३ रोजी राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ चा अहवाल खंड-२ मधील वेतनश्रेण्यांविषयक अनुषंगिक शिफारशी स्विकृत करण्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित केला असून, त्यामध्ये उक्त पदांचा समावेश केलेला नाही.
(५) दिव्यांगांच्या विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित विशेष शाळा, कर्मशाळा (प्रशिक्षण केंद्र) आणि अनाथ मतिमंद बालगृहे यांना मंजूर करावयाच्या अनुदानासंबंधी/ अनुदान तत्वावर आणण्यासाठी मान्यतेबाबत धोरणाचा मसूदा शासनस्तरावर तयार करुन त्यास नियोजन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, कौशल्य विकास व उद्योजकता विकास विभाग, अल्पसंख्यांक विकास विभाग व आदिवासी विकास विभागाचे अभिप्राय घेऊन वित्त विभागामार्फत मा.मंत्रीमंडळाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे.

दिव्यांगांसाठीच्या विशेष उपक्रमांमधील वसतीगृह अधिक्षक / गृहपाल यांच्या वेतनश्रेणीत सुधारणा करणेसंदर्भातील प्रस्ताव सातव्या वेतन आयोगातील वेतनश्रेणीतील त्रुटींचे निवारण करण्याकरीता वित्त विभागामार्फत गठीत वेतन त्रुटी निवारण समिती २०२४ समोर सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेतर्फे (बार्टी) प्रशिक्षण केंद्रे सुरु करण्यासह निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(१४) * ७९४४३ डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.संजय पोतनीस (कलिना), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.राजेश एकडे (मलकापूर), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व जिल्ह्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत (बार्टी) राबविण्यात येणारे विविध परीक्षांचे प्रशिक्षण कार्यक्रम मागासवर्गीयांना नि:शुल्क देण्याकरिता प्रशिक्षण केंद्र उभारण्याचा निर्णय शासनाने एक वर्षापूर्वी घेवूनही त्याची अद्याप अंमलबजावणी केली नसल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील आयबीपीएस, एमपीएससी व पोलीस भरतीकरिताचे प्रशिक्षण मागील १० महिन्यांपासून सुरु नसल्यामुळे हजारो अनुसूचित जाती व नवबौद्ध विद्यार्थी प्रशिक्षणापासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सामाजिक न्याय विभागाकडून बार्टीसाठी सन २०२२-२३ मध्ये प्राप्त झालेल्या २८८ कोटी रुपयांपैकी केवळ ९१ कोटी रुपये खर्च झाले असून व सन २०२३-२४ साठी मंजूर झालेल्या ३६५ कोटी रुपयांपैकी केवळ ७५ कोटी रुपये निधी प्राप्त झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अपुऱ्या निधीमुळे सन २०२२ मध्ये पात्र झालेले ७६३ संशोधक विद्यार्थी २ वर्षापासून फेलोशिप पासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच समान धोरण राबविण्याकरिता आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे, बार्टी, सारथी तसेच महाज्योती या संस्थांकडून घेण्यात येणाऱ्या परिक्षा व कार्यक्रमांची अंमलबजावणी व सनियंत्रण करण्यासाठी आयुक्त, टीआरटीआय यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली असल्यामुळे सदरहू संस्थांची स्वायत्तता धोक्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सर्व जिल्ह्यात प्रशिक्षण केंद्रे, पुरेसा निधी, संशोधक विद्यार्थ्यांना फेलोशिप तसेच या संस्थांची स्वायत्तता कायम ठेवणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही
(४) हे खरे नाही
(५) हे खरे नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे येथील मलजल प्रकल्पांतर्गत झालेल्या गैरव्यवहार

**(१५) * ८११८३ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे महानगरपालिकेने कोपरी येथे चेन्नई व नवी मुंबईच्या धर्तीवर अत्याधुनिक मलजल प्रकल्प उभारण्याचा निर्णय तीन वर्षापुर्वी घेतला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पाचा कार्यारंभ आदेश मिळाल्यापासून २४ महिन्यात अंमलबजावणी करावयाची असतांना गत तीन वर्षात या प्रकल्पाचे कोणतेही काम करण्यात आलेले नसताना महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी तत्कालीन महानगरपालिका आयुक्तांची मंजुरी न घेता कंत्राटदारास २ कोटी रुपये अदा केल्याचे दिनांक १ एप्रिल, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान तक्रार केली असल्याचे देखील निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रकल्प तातडीने पूर्ण करणेबाबत तसेच संबंधित कंत्राटदार व जबाबदार अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) ठाणे महानगरपालिकेने कोपरी येथील मलप्रकीया केंद्राचे (संलग्न मलउदंचन केंद्रासह) सर्व समावेशक परिचालन, निगा, देखभाल व दुरुस्ती करणे (भाग-१) आणि मलप्रक्रिया केंद्रातील मलजलापासुन वीज निर्मिती, प्रक्रिया केलेल्या पाण्याचा पुर्नवापर करणेकामी PPP तत्वावर प्रकल्प (भाग-२) उभारण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे.
(२) सदर प्रकल्पातील भाग १ नुसार मलप्रक्रिया केंद्राची सर्वसमावेश परिचलन व निगा, देखभाली कामी निविदा व सवलत करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार माहे सप्टेंबर, २०२२ ते जुलै, २०२३ या कालावधीतील देयक रकमेपैकी रक्कम रू. २,५३,३७,३७०/- चे देयक प्रचलित कार्यालयीन पध्दतीनुसार ठेकेदारास अदा करण्यात आल्याची बाब महानगरपालिकेने कळविली आहे.
(३) सदर प्रकरणी लोकप्रतिनिधींमार्फत तक्रार करण्यात आली आहे, ही वस्तुस्थिती आहे.
(४) ठाणे महानगरपालिकेने कळविल्यानुसार मलजलावर प्रक्रिया ही दैनंदिन बाब असून त्यामध्ये तंत्रज्ञान व मनुष्यबळाचा वापर होतो. तथापि, प्रकल्पाच्या परिचालन व निगा देखभालीचे देयक अदा करणे क्रमप्राप्त आहे.

तसेच प्रकल्पाच्या भाग-२ नुसार VJTI, मुंबई यांचेकडून Power Generation Unit व Tertiary Treatment Plant चे Engineering Drawings And Design प्रमाणित करून मिळाल्यानंतर दोन्ही युनिटची उभारणीचे काम ठेकेदारामार्फत सुरू करण्यात येणार असल्याची बाब महानगरपालिकेने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**ठाणे-बेलापूर मार्गावर होणारी वाहतुक कोंडी सोडविण्यासाठी घणसोली ते ऐरोली दरम्यान खाडीपूल उभारण्याबाबत**

**(१६) * ७९५५९ डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे-बेलापूर मार्गावर होणारी वाहतुक कोंडी सोडविण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातुन घणसोली ते ऐरोली दरम्यान खाडीपूल उभारण्यासाठी मा.आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी दिनांक २० एप्रिल, २०२४ रोजी पाहणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त पाहणीच्या अनुषंगाने शासनाने ठाणे-बेलापूर मार्गावरील वाहतुक कोंडी सोडविण्यासाठी महत्वाच्या असलेल्या घणसोली ते ऐरोली दरम्यान खाडीपूल प्रकल्प उभारण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी सदर कामाचा आढावा घेण्यासाठी दि. १९.०४.२०२४ रोजी पाहणी केली, हे खरे आहे.
(२) नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील घणसोली पामबीच मार्गावर घणसोली ते ऐरोली खाडीवर ब्रिज बांधणे या कामांसाठी जाहिर निविदा मागवून निवेदेप्रक्रियेच्याअंती कंत्राटदाराची नियुक्ती करण्यात आली असून दि.१४.०३.२०२४ रोजी कंत्राटदारास कार्यादेश देण्यात आले आहेत.
सदर कामाचे दि.१५.०३.२०२४ रोजी भूमीपूजन करण्यात आले असून सद्यस्थितीत कामाच्या ठिकाणी Mobilization, सर्वेक्षण, Designing इत्यादी कामे प्रगतीपथावर आहेत.
सदर कामाचा कालावधी दि.१४.०३.२०२४ ते १३.०९.२०२६ असा आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील सामूहिक जैववैद्यकीय कचऱ्यांचे वर्गीकरण करण्याबाबत**

**(१७) * ८२२८५ श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात जैववैद्यकीय कचरा सन २०१६ च्या नियमानुसार व्यवस्थापन केंद्रात येणारा जैववैद्यकीय कचरा स्त्रोताच्या ठिकाणीच विलगीकरण होवून येत नसल्याचे सामाईक जैववैद्यकीय केंद्राच्या भेटीत माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने (एमपीसीबी) आयआयटी मुंबईकडे या सर्वेक्षणाची जबाबदारी सोपवली असून या कचऱ्याचे सुरक्षित आणि पर्यावरणदृष्ट्या योग्य पद्धतीने व्यवस्थापन व्हावे यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने कठोर मार्गदर्शक तत्वे जारी केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कचरा एकत्र आल्यानंतर सामूहिक जैववैद्यकीय केंद्रामधील कर्मचाऱ्यांना याचे विलगीकरण करावे लागत असल्यामुळे कर्मचाऱ्यांसह परिसरातील नागरिकांच्या आरोग्याला आणि पर्यावरणाला धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यात विशेषत: मुंबईतील अनेक मोठ्या रुग्णालयांमध्ये कचऱ्याचे स्त्रोतापाशी विलगीकरण करणे, बारकोडींग करणे इ.नियमांचे पालन करण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, जैववैद्यकीय कचरा विलगीकरणा संदर्भातील तरतूदींची कठोर अंमलबजावणी करण्यासंदर्भात प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन या संदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय अंशतः खरे आहे.
(२) होय खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) होय अंशतः खरे आहे.

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने महाराष्ट्रातील सर्व जैव वैद्यकीय कचरा प्रकिया केंद्रांना त्यांच्या अतर्गत येणाऱ्या वैद्यकीय आस्थापनांना नियमितपणे कचरा विलगीकरण करण्यासंदर्भात व बारकोड प्रशिक्षण देण्याबाबत निर्देश दिले आहेत व सामुहिक जैव वैद्यकीय कचरा प्रक्रिया केंद्राकडून त्यांच्या अतर्गत येणाऱ्या वैद्यकीय आस्थापनांना वेळोवेळी प्रशिक्षण दिले जाते. तसेच वैद्यकीय आस्थापनांना जैव वैद्यकीय कचरा प्रकिया केंद्रकडून वर्गीकरण कसे करावे या बाबतचे छायाचित्रफलक पुरविले जातात.

वैद्यकीय आस्थापनांना व सामुहिक जैव वैद्यकीय कचरा प्रकिया केंद्राना प्रदान करण्यात येणाऱ्या एकत्रीत संमतीपत्र व जैव वैद्यकीय कचरा प्राधिकारपत्रात जैव वैद्यकीय कचऱ्याची वर्गीकरण व हाताळणी जैव वैद्यकीय कचरा व्यस्थापन नियम २०१६ अनुसूची -१ प्रमाणे करण्याबाबतची अट समाविष्ट केलेली आहे.

तसेच सामुहिक जैव वैद्यकीय कचरा प्रकिया केंद्रानी त्यांच्या अतर्गत येणाऱ्या वैद्यकीय आस्थापनांना व प्रक्रिया केंद्रात कार्यरत असण्या-या कर्मचा-यांना प्रशिक्षण देण्याबाबतची अट त्यांना प्रदान करण्यात येणाऱ्या एकत्रीत संमतीपत्र व जैव वैद्यकीय कचरा प्राधिकारपत्रात समाविष्ट केलेली आहे व सदर अटीची पुर्तता करण्यासाठी बँक हमी घेतली जाते. अटीची पूर्तता न झाल्यास नियमाप्रमाणे कारवाई करण्यात येते.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईमध्ये वाहनांची संख्या वाढत असल्याने होणारे प्रदूषण रोखण्याबाबत

**(१८) * ७९६९४ श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईत वाहनांच्या वाढत्या संख्येमुळे वाहतूक कोंडी व प्रदूषणात मोठ्या प्रमाणात वाढ होत असून मानवी आरोग्यावर विपरीत परिणाम होत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रदूषण वाढीसंदर्भात प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात येत नसल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, मुंबईतील एकूण वाहनांची संख्या सुमारे ४६ लाखांपर्यंत गेली असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वाढते प्रदुषण रोखण्याच्या दृष्टीने वाहनांची नियमित तपासणी करणेबाबत कोणती उपाययोजना करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन वाहतूक कोंडी व पर्यावरणहानी रोखण्याबाबत तसेच याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) मुंबईतील प्रादेशिक परिवहन कार्यालयातील वायुवेग पथकांमार्फत वायु व ध्वनी प्रदूषण करणाऱ्या वाहनांची मोटार वाहन कायद्यांतर्गत नियमित तपासणी करुन कारवाई करण्यात येते.
(३) वाहन पोर्टलवरील उपलब्ध माहितीनुसार आजपर्यंत मुंबईतील प्रादेशिक परिवहन कार्यालयात ३६,७१,३०५ इतक्या वाहनांची नोंदणी झाली आहे.
(४) व (५) मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार मुंबई शहराच्या दहिसर नाका, आनंद नगर नाका, मुलुंड (जुना) नाका, ऐरोली जकात नाका व मानखुर्द जकात नाका या ५ जकात नाक्यावर वायुप्रदुषण साठी विशेष तपासणी मोहिम नोव्हेंबर-२०२३ पासून सुरु असून २४ तास तपासणी केली जाते. तसेच वायु व ध्वनी प्रदूषण करणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्यासाठी वायुवेग पथकांमार्फत वायू व ध्वनी प्रदूषण करणाऱ्या वाहनांची मोटार वाहन कायद्यांतर्गत नियमित तपासणी करुन कारवाई करण्यात येते.

प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून मुंबई महानगर क्षेत्रातील जकात नाक्यांवर वायू प्रदूषणाच्या अनुषंगाने नोव्हेंबर २०२३ ते मे २०२४ या कालावधीत एकूण ३०६०६ वाहने तपासली असून त्यामध्ये ४२३३ दोषी वाहनधारकांकडून रु.५०.१६ लक्ष एवढा दंड वसूल करण्यात आला आहे.

शासन निर्णय दिनांक २३.०७.२०२१ नुसार इलेक्ट्रिक वाहन धोरण-२०२१ राबविण्यात येत असून सदर धोरणात प्रदूषणामुळे पर्यावरण हानी रोखण्याकरिता इलेक्ट्रिक वाहन खरेदी करण्याकरिता प्रोत्साहने देण्याची तरतूद करण्यात आली आहे.

टॅक्सी /रिक्षांचा पर्याप्त क्षमतेने वापर होण्यासाठी शहरात विविध मार्गावर शेअर-ए-टॅक्सी/रिक्षा सेवा कार्यान्वित करण्यात आली आहे.

सार्वजनिक प्रवासी सेवांचा वापर वाढविण्याच्या दृष्टीकोनातून MMRDA व्दारे मेट्रो रेल्वेच्या उभारणीचे काम सुरु आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मीरा-भाईदर (जि.ठाणे) महानगरपालिकेच्या आरक्षित असलेल्या जागेत विकासकाने इमारतीचे बांधकाम केल्याबाबत

**(१९) * ८०१६३ श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मीरा-भाईदर (जि.ठाणे) महानगरपालिकेच्या मिरारोड येथील रुग्णालयाकरिता आरक्षित असलेल्या जागेत टीडीआरच्या माध्यमातून मल्टीस्पेशालिटी रुग्णालय बांधण्याबाबत लोकप्रतिनिधींमार्फत महानगरपालिकेकडे मागणी केल्यानंतर सदर आरक्षित जागेवर मल्टीस्पेशालिटी रुग्णालय उभारण्यासाठी भूमिपूजन करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बांधकामाकरिता महानगरपालिकेने नियुक्त केलेल्या विकासकाने रुग्णालयाचे बांधकाम सुरु न करता स्वत:च्या इमारतीचे बांधकाम पूर्ण करून त्यातील सदनिकांच्या विक्रीस सुरुवात केली असल्याची बाब माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन विकासकावर फसवणुकीचा गुन्हा दाखल करुन सदनिकांची विक्री थांबविणेबाबत तसेच यास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) मिरा-भाईंदर शहराच्या मंजूर विकास योजनेमधील मौजे नवघर येथील आरक्षण क्रमांक ३०२ "हॉस्पीटल" या आरक्षणामध्ये समावेशक आरक्षणांतर्गत विकासक/जमिनमालक यांना दि. ०७.१०.२०२२ रोजी हॉस्पीटल बांधकामासाठी महानगरपालिकेने परवानगी दिली असून, सदर परवानगीच्या अनुषंगाने भूमिपुजन करण्यात आले, हि वस्तुस्थिती आहे.
(२) हॉस्पीटल करीता विकास परवानगी अदा केल्यानंतर विकासक यांना समावेशक आरक्षणाच्या तरतुदीनुसार त्यांच्या मालकीच्या बाधीत जमिनीपैकी अनुज्ञेय क्षेत्रावर रहिवास व वाणिज्य वापरासाठी दि.१७.०४.२०२३ रोजी विकास परवानगी दिलेली आहे.
उक्त विकास परवानगीमधील अटी व शर्तीची पूर्तता न केल्याने दिलेल्या परवानगीस महानगरपालिकेने दि.२१.०६.२०२३ रोजी स्थगिती दिली आहे.
दिलेल्या दोन्ही परवानगीच्या अनुषंगाने विकासक यांनी जागेवर इमारतीचे बांधकाम सुरु केलेले नाही. तथापि, महानगरपालिकेने दिलेल्या बांधकाम परवानगीच्या अनुषंगाने इमारतीमधील सदनिकांचे, खरेदीचे करारनामे, सह दुय्यम निबंधक कार्यालयात नोंद झाले असल्याचे निदर्शनास आले आहे.
(३) विकासकास रहिवास व वाणिज्य वापरासाठी दिलेल्या विकास परवानगीस महानगरपालिकेने स्थगिती दिलेली आहे. तथापि, सदर स्थगिती आदेशाविरुध्द विकासकाने मा. उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली असुन सदर प्रकरण सद्यस्थितीत न्यायप्रविष्ठ आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भिवंडी (जि. ठाणे) शहरात बनावट तूप तयार करण्यात येत असल्याबाबत

**(२०) * ७९९९४ श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्रीमती मंजुळा गावीत (साक्री) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी (जि. ठाणे) शहरातील खाडीलगत असलेल्या ईदगाह रोड येथील महानगरपालिकेच्या मालकीच्या स्लॉटर हाऊस येथे मोठया प्रमाणावर म्हशी व रेडा यांची चरबी वितळवून बनावट तूप तयार करित असल्याची बाब माहे जानेवारी, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ठिकाणाहून तुपाचा मोठ्या प्रमाणावर साठा ताब्यात घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन अशा घटना रोखण्याबाबत तसेच संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेने कळविल्यानुसार ईदगाह रोड येथील महानगरपालिकेच्या मालकीच्या स्लॉटर हाऊस येथे अतिक्रमण करुन अनधिकृतपणे विनापरवाना जनावरांचे शिल्लक अवशेष वितळवून पांढऱ्या रंगाचा तुपासारखा पदार्थ बनविण्याचे काम सुरु असल्याची बाब दिनांक ०२.०१.२०२४ रोजी महानगरपालिकेच्या पथकास निदर्शनास आली आहे.

तथापि, सदर ठिकाणी असलेल्या मुद्देमाल उदा. कढई, तुपासारखा पदार्थाचे डब्बे इत्यादी साहित्य जप्त करण्यात आले आहे. तसेच सदर साहित्य भोईवाडा पोलीस स्टेशनच्या ताब्यात दिल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

सदर प्रकरणी संबंधितांविरुध्द महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तसेच भारतीय दंड संहिता मधील विविध कलमान्वये पोलीस स्टेशन, भिवंडी येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच सदर प्रकरणी पोलीस विभाग व अन्न व औषध विभाग यांना पुढील कार्यवाहीस्तव महानगरपालिकेमार्फत अवगत करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील चर्मोद्योग महामंडळाच्या विविध मागण्यांबाबत

**(२१) * ८०४६४ श्री.बंटी भांगडिया (चिमूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्रीमती श्वेता महाले (चिखली), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील चर्मोद्योग महामंडळाचे दिव्यांग बांधव तसेच अनेक नागरिकांकडे कोट्यवधी रुपयांचे कर्ज थकीत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर थकीत कर्ज बिनशर्त माफ करुन पुढील कर्ज वाटपातील जाचक अटी रद्द करून सरळ पद्धतीने कर्ज देण्याच्या प्रमुख मागणीसह इतर अनेक मागण्यांचे निवेदन चर्मकार समाज बांधवांनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे माहे फेब्रुवारी, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान केले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, गटई कामगारांना महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषद, ग्रामपंचायत स्तरावर पीच परवाना व अपघात आरोग्य विमा देणे, देवनार येथील महामंडळाच्या जागेत आंतरराष्ट्रीय दर्जाचे आधुनिक लेदर हब क्लस्टर व प्रशिक्षण व जागतिक दर्जाचे विक्री केंद्र उभारणे तसेच वसतीगृह उभारणे, वांद्रे येथील एकमेव चर्मकला महाविद्यालय पूर्ववत करून लेदर इंजीनियरिंग पदवी व इतर लेदर कोर्सेस सुरू करण्यात यावे, चर्मोद्योग महामंडळ तसेच चर्मकार कल्याण आयोग यांचे अध्यक्ष व संचालक मंडळ यांच्या तात्काळ नियुक्त्या करण्यात याव्यात या व इतर मागण्या मा.मुख्यमंत्री महोदयाकडे चर्मकार समाजातील नागरिकांनी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) होय हे खरे आहे.

(४) उपरोक्त विषयांच्या अनुषंगाने दिनांक १२ फेब्रुवारी, २०२४ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री राज्य अतिथिगृह येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीचे इतिवृत्त मा.मुख्यमंत्री महोदयांच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आलेले आहे. तदनंतर आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील नदयांच्या प्रदूषणात वाढ झाल्याबाबत**

**(२२) * ७९४७२ श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्रीमती मंजुळा गावीत (साक्री), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.माधवराव पवार (हदगाव), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्रिय प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या सन २०२२-२०२३ च्या अहवालानुसार अतिप्रदुषणामुळे नद्यांची परिस्थिती गंभीर झाली असून काही नद्यांची खोरी नामशेष होण्याच्या मार्गावर असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) राज्यातील महानगरपालिका क्षेत्रातील तसेच औद्योगिक वसाहतीतील सांडपाणी व रासायनिक मिश्रित पाणी कोणतीही प्रक्रिया न करता दररोज राज्यातील प्रामुख्याने गोदावरी, पाताळगंगा, उल्हास, मुळा, मुठा, भीमा, पंचगंगा व पवना या नदीपात्रात सोडले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, नदीपात्रात वाढलेल्या जलपर्णीमुळे नदीकाठच्या गावांना अशुध्द पिण्याचे पाणी मिळत असून दुषित पाण्यामुळे डेंगू, मलेरिया यासारख्या आजारांमुळे नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झालेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) राज्यातील नद्यांचे होणारे प्रदूषण रोखण्यासाठी तेथे शोषखड्डे काढणे, बांध घालणे व सांडपाण्यावर प्रक्रिया करणे यासारख्या विविध उपाययोजना राबविण्यासाठी कृती आराखडा तयार करण्यात आला आहे काय,

(५) असल्यास, गोदावरी नदी पुनर्जीवित करण्यासाठी केंद्रिय जलशक्ती मंत्रालयातर्फे नमामि गंगा प्रकल्पाच्या धर्तीवर महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येणारा नमामि गोदा हा महत्वाकांक्षी प्रकल्प अद्यापही प्रलंबित असून तो तातडीने पूर्ण करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) असल्यास, राज्यातील नद्यांचे वाढलेले प्रदूषण रोखण्याकरिता अनेक लोकप्रतिनिधींनी व स्थानिकांनी केलेल्या मागणीनुसार संबंधित मंत्री महोदयांसमवेत दिनांक १७ एप्रिल, २०२३ रोजी बैठक झाली त्यावेळी नद्यांचे प्रदूषण रोखण्याकरीता श्री. शेखर भाडसावली यांचे तंत्रज्ञान वापरण्याचे आदेश देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सत्वर चौकशी करुन राज्यातील नद्यांचे प्रदूषण रोखणे, प्रदूषणामुळे होणाऱ्या आरोग्यविषयक समस्या सोडविणे तसेच प्रदूषणास जबाबदार असलेल्या कंपन्या व दोषी अधिकारी / कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(८) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) हे खरे नाही.

जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या अहवालानुसार नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम झाल्याबाबत तक्रारी प्राप्त नाही.

(४) हे खरे आहे.

(५) नाशिक महानगरपालिकेमार्फ़त नमामि गोदा प्रकल्प राबविण्यासाठी सल्लागाराची नेमणूक करण्यात आली असून सल्लागारामार्फत सविस्तर अहवाल तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(६) प्रश्नाधिन विषयाबाबत आयोजित बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयानुसार नदीपात्रामधील जलपर्णीची समस्या सोडविण्याकरिता प्रश्नाधीन तंत्रज्ञानाच्या वापराबाबत प्रायोगिक तत्वावर पडताळणी करण्याचे निर्देश महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास देण्यात आले आहेत.

(७) महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फ़त राज्यातील नदी पट्ट्यांचे प्रदूषण कमी करण्याकरिता प्रदूषित नद्यांचे कृती आराखडे तयार करून केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे सादर करण्यात आले आहेत. सदर कृती आराखड्यांची अंमलबजावणी विविध विभागांमार्फत करण्यात येत आहे.

मा.हरित लवादाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे प्रदूषित नदी पट्ट्यांमध्ये प्रदूषण रोखण्याकरीता स्वतंत्र पर्यावरण संनियंत्रण दलाची स्थापना प्रदूषित नदी पट्टे असलेल्या सर्व जिल्ह्यांमध्ये करण्यात आली आहे.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांना त्यांच्या वार्षिक अंदाजपत्रकात २५ % रक्कमेची तरतूद सांडपाणी व नागरी घनकचऱ्याच्या व्यवस्थापनासाठी ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या हद्दीमधून निर्माण होणाऱ्या व विनाप्रक्रिया सोडण्यात येणाऱ्या घरगुती सांडपाण्यामुळे होणाऱ्या जलप्रदूषणाच्या अनुषंगाने संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांविरुद्ध महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत जल (प्रदुषण, प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९७४ मधील तरतुदीनुसार वेळोवेळी कारवाई करण्यात येते. औद्योगिक कारखान्यांना नदीमध्ये अप्रक्रियाकृत सांडपाणी सोडण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. तसेच, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने तयार केलेल्या अंमलबजावणी धोरणानुसार प्रदुषणकारी उद्योगांवर कारवाई करण्यात येते.

उद्योगांमधून निर्माण रासायनिक सांडपाण्यामुळे होणाऱ्या जलप्रदूषणाच्या अनुषंगाने संबंधित उद्योगांवर जल (प्रदुषण, प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९७४ मधील तरतुदीनुसार वेळोवेळी कारवाई करण्यात येते.

(८) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जव्हार (जि.पालघर) नगरपरिषदेमध्ये झालेला गैरव्यवहार

**(२३) * ७९५२९ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार (जि.पालघर) नगरपरिषदेमध्ये सन २०१८ ते २०२१ या कालावधीत उद्यान विकसित करणे, रस्ते बांधणी करणे, विद्युत खांब बसवणे, संरक्षण भिंत उभारणे अशा वेगवेगळ्या कामांमध्ये बनावट कागदपत्र, स्वाक्षरी व शिक्क्यांचा वापर करून सुमारे २८ कोटी रुपयांपेक्षा अधिक रकमेची अनियमितता केल्याचे दिनांक ५ जानेवारी, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासकीय दरापेक्षा अधिक दराचे अंदाजपत्रक तयार करुन त्यास बनावट तांत्रिक व प्रशासकीय मान्यता घेऊन विकासकामे करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात सहाय्यक जिल्हाधिकारी श्रीमती आयुषी सिंग यांनी जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, पालघर यांचेकडे दिनांक ४ फेब्रुवारी, २०२२ रोजी अहवाल सादर केला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू अहवाल दिनांक १३ मार्च, २०२३ रोजी म्हणजेच १ वर्ष विलंबाने कोकण आयुक्तांकडे पाठविण्यात आला असून अद्यापही या प्रकरणी दोषींवर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) जव्हार नगरपरिषदेच्या हद्दीतील छत्रपती शिवाजी महाराज उद्यान सुशोभिकरण विकास करणे याकामी नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेने केलेल्या ठरावानुसार तत्कालीन जिल्हा दरसूची (DSR) नुसार कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले. सदर अंदाजपत्रकास तांत्रिक व प्रशासकीय मान्यता घेऊन संकेतस्थळावर ऑनलाईन / वृत्तपत्रांत प्रसिध्दी देऊन खुल्या निविदा मागविण्यात आल्या व विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन कार्यादेश देण्यात आला. ज्यावेळी सदर कामाच्या तांत्रिक मान्यतेबाबत शंका उपस्थित झाली त्यावेळी नगरपरिषदेने याबाबत चौकशी केली असता अंदाजपत्रकावरील सही व शिक्के खोटे असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर नगरपरिषदेने जव्हार पोलीस ठाणे येथे प्रथम माहिती अहवाल नोंदविला आहे. सदर कामाचे त्रयस्थ तांत्रिक तपासणी (Third Party Inspection) प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, वांद्रे, मुंबई यांचेमार्फत करण्यात आले असून काम सुस्थितीत असल्याचे त्यांच्या अहवालात नमूद करण्यात आले. याप्रकरणी नगरपरिषदेचे अर्थिक नुकसान झालेले नसून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(३) सहायक जिल्हाधिकारी, जव्हार विभाग, जव्हार यांनी चौकशी करुन त्याबाबतचा अहवाल दि.०८/०२/२०२२ रोजी जिल्हाधिकारी, पालघर यांना सादर केला आहे.

(४) व (५) जव्हार नगरपरिषदेतील विविध विकास कामांबाबतचा चौकशी अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयाने पडताळणी करुन अभिप्रायांसह शासनास सादर केला असून नियमोचित कार्यवाही करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील प्रमुख शहरांमध्ये विविध कंपन्यांकडून होणाऱ्या वायू व ध्वनी प्रदूषणाबाबत**

**(२४) * ७९४४४ डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या माहितीनुसार राज्यात विशेषत: पुणे, नागपूर, चंद्रपूर, अमरावती इत्यादी ठिकाणी पेपर मिल, स्टील प्लांट व सिमेंट इत्यादी कंपन्यांकडून वायू व ध्वनी प्रदूषणात वाढ झाली असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कंपनीमध्ये रात्रीच्यावेळी स्फोटासारखे आवाज येत असल्याने ध्वनी प्रदूषणात वाढ होत असून याबाबत नागरिकांनी प्रदूषण मंडळाकडे लेखी तक्रार करुनही याबाबत कंपनीविरुध्द कोणतीही कारवाई केली जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चंद्रपूर येथील प्रदूषण रोखण्यासाठी बसविलेले हवा व जल प्रदूषण नियंत्रण यंत्र पूर्णत: बंद पडले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त वायू प्रदूषणामुळे नागरिकांमध्ये दुर्धर आजाराचे प्रमाण वाढून आरोग्य धोक्यात आले असून शेत पिकांचे नुकसान होत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी सखोल चौकशी करुन वायू, ध्वनी व जल प्रदूषण रोखणे तसेच नागरिकांच्या आरोग्य विषयक समस्या तसेच शेत पिकाचे नुकसानीस कारणीभूत असलेल्या कंपन्या व संबंधित दोषी अधिकारी / कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे, नागपूर, चंद्रपूर व अमरावती तसेच जिल्हा आरोग्य अधिकारी, महानगरपालिका, नागपूर यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार वायु प्रदूषणामुळे नागरिकांमध्ये दुर्धर आजाराचे प्रमाण वाढले असल्याचे दिसून येत नसल्याबाबत कळविण्यात आले आहे.

जिल्हा अधिक्षक, कृषी अधिकारी, पुणे, नागपूर, चंद्रपूर व अमरावती यांच्या कार्यालयाकडे वायू प्रदूषणामुळे शेतपिकांच्या नुकसानीत वाढ झाल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या नसल्याबाबत कळविण्यात आले आहे.

(५) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे उद्योगांची वेळोवेळी पाहणी करण्यात येते व पाहणीदरम्यान त्रुटी आढळलेल्या उद्योगांवर वायु (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९८१ मधील तरतुदींनुसार कारवाई करण्यात येते.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील अंधेरी येथील गोपाळकृष्ण गोखले पूल व बर्फीवाला पूल यांच्या उंचीच्या पातळीत तफावत असल्याबाबत

**(२५) * ७९५६३ डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधेरी मुंबई येथे विकासकाच्या चुकीमुळे गोपाळकृष्ण गोखले पूल व बाजूचा बर्फीवाला पूल यांच्या उंचीच्या पातळीत तफावत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दोन पुलांच्या पातळीतील तफावत तसेच त्यासाठीची उपाययोजना सुचविण्यासाठी सर्वेक्षण करण्याकरिता महानगरपालिकेने दिनांक ९ मार्च, २०२४ रोजी व्हीजेटीआय संस्थेला पत्राव्दारे कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विकासकाच्या चुकीमुळे महानगरपालिकेचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर दोन पुलांच्या पातळीतील तफावत दुर करणेबाबत तसेच यास जबाबदार विकासक व संबंधित अधिकारी / कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) मुंबईतील अंधेरी येथे पुनर्बांधणीनंतर नवीन गोपाळकृष्ण गोखले पूल व बाजूचा जुना बर्फीवाला पूल यांच्या पातळीत तफावत आहे.

(२) हे खरे आहे.

सदर गोपाळकृष्ण गोखले पूल व बर्फीवाला उड्डाणपूल यांच्या जोडणीच्या कामाकरिता व्ही.जे.टी.आय. संस्थेला सल्लागार म्हणून संमती प्राप्त करण्याकरिता दिनांक १३.०२.२०२४ रोजी ई-मेलद्वारे कळविण्यात आले होते. तदनंतर सदर कामाबाबत सविस्तर चर्चेअंती दोन्ही पुलाच्या उंचीतील तफावत दूर करण्याबाबत आवश्यक ते सर्वेक्षण करण्याकरिता व्ही.जे.टी.आय. संस्थेस पत्राद्वारे कळविण्यात आले आहे.

(३) हे खरे नाही.

सदर कामामध्ये कोणत्याही विकासकाचा संबंध नाही. गोखले पुलाचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून निविदा काढून कंत्राटदारामार्फत करण्यात येत आहे.

(४) गोपाळकृष्ण गोखले पूल (रेल्वे हद्दीतील भाग) माहे नोव्हेंबर मध्ये वाहतूकीकरिता बंद करण्यात आला. गोखले पूल बंद करण्यात आल्यामुळे या वाहतूक समस्येतून लोकांची मुक्तता व्हावी. याकरिता गोखले पुलाची उत्तरे कडील एक मार्गिका त्वरित सुरू करणे व त्यानंतर दुसरे मार्गिका सुरू करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

तदनंतर उत्तरेकडील बर्फीवाला उड्डाणपुलाला गोखले पुलाशी जोडण्याचे काम हाती घेण्यात आले असून व्ही.जे.टी. आय. या संस्थेची सदर कामासाठी विशेष सल्लागार म्हणून दि.१३.०२.२०२४ रोजी स्वीकृती प्राप्त करण्यात आली व दि.०७.०३.२०२४ रोजी व्ही.जे.टी. आय या संस्थेस सदर जोडणीचे आराखडे इत्यादी कामासाठी चे आदेश देण्यात आले. सदर जोडणीचे आराखडे व नकाशे व आराखडे तपासण्याचे काम आय. आय.टी या संस्थेस दि.२६.०३.२०२४ रोजी देण्यात आले. सद्य:स्थितीत सदर जोडणीचे काम प्रगतीपथावर असून सदर काम दिनांक ०१.०७.२०२४ पर्यंत पूर्ण करण्याचा मानस आहे.

गोपाळकृष्ण गोखले पूल (रेल्वे हद्दीतील जुनापूल) हा रेल्वे ट्रॅकपासून सुमारे ५.७२ मी. उंचीवर होता. रेल्वे प्रशासनाच्या नवीन अद्ययावत निकषांनुसार गोखले पुलाची वाढीव उंची रेल्वे ट्रॅकपासून सुमारे ८.४६ मी. उंचीवर पुनर्बांधणी करण्याकरिता पश्चिम रेल्वे विभागाकडून बांधण्यासाठी मंजुरी देण्यात आली. त्यानुसार रेल्वे हद्दीतील सर्व कामे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात आल्याचे निर्धारित करण्यात आले.

सदर गोखले पुलाच्या पुनर्बांधणीदरम्यान रेल्वेच्या निकषाप्रमाणे वाढीव उंचीमुळे पुलाच्या पोहोच मार्गाचे महानगरपालिका हद्दीतील काम देखील ८.४६ मीटर इतक्या उंचीवरुन करण्यात आले.

बर्फीवाला उड्डाणपूल हा जुन्या गोखले पुलाच्या पोहोच मार्गांना येऊन ५.७२ मी. उंचीवर येऊन जोडलेला होता. परंतु गोखले पुलाचे पुनर्बांधणीचे काम ८.४६ इतक्या वाढीव उंचीवर केले जात असल्याकारणाने बर्फीवाला उड्डाणपुलाची जुनी पातळी व गोखले पुलाची पुनर्बांधणी नंतरची वाढीव पातळी यामध्ये तफावत येणे स्वाभाविक होते. यास्तव, कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील महानगरपालिकेच्या एम/पूर्व विभागातील नर्सिंग होमची नोंदणीच आरोग्य विभागाकडे केली नसल्याबाबत

**(२६) * ८००३२ श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील गोवंडी, मानखुर्द येथे महानगरपालिकेच्या एम/पूर्व विभागातील ३४ नर्सिंग होमची नोंदणीच आरोग्य विभागाकडे झाली नसल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर परिसरात अनधिकृत नर्सिंग होम / क्लिनिक सुरु असून त्याकडे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडून दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा क्लिनिक किंवा नर्सिंग होममध्ये कार्यरत असणारे डॉक्टर किंवा तंत्रज्ञ प्रशिक्षित अनुभवी असल्याबाबतची कोणतीही माहिती प्रशासनाकडे उपलब्ध नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अशा नर्सिंग होम / क्लिनिकमध्ये अग्निसुरक्षा उपाययोजना, औषधे, वैद्यकीय सुविधा यांची देखील तपासणी व अंमलबजावणी होत नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन नागरिकांना अद्ययावत आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत तसेच दोषी रुग्णालय प्रशासन व अधिकारी/कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

मुंबईतील एम/पूर्व विभागात ४१ नोंदणीकृत व नोंदणी न झालेले २० खाजगी नर्सिंग होम आहेत.

(२) हे खरे नाही.

सदर परिसरातील नोंदणी न झालेल्या नर्सिंग होमची बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत पाहणी करण्यात आली असून, सदर नर्सिंग होमवर महाराष्ट्र नर्सिंग होम ॲक्ट सन १९४९ अन्वये कारवाई करुन प्रथम वर्ग महानगर दंडाधिकारी न्यायालयात दावे दाखल करण्यात आले आहेत.

(३) हे खरे नाही.

एम/पूर्व विभागातील नोंदणी न झालेल्या खाजगी नर्सिंग होमची बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत पाहणी केली असता, सदर नर्सिंग होममध्ये प्रशिक्षित डॉक्टर आणि परिचारीका काम करत असल्याचे आढळून आले आहे.

(४) हे खरे नाही.

नर्सिंग होम / क्लिनिक यांचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने संबंधित वॉर्डचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांचेमार्फत अग्निशमन दलास प्राप्त झाल्यानंतर अग्निसुरक्षा व अग्निप्रतिबंधक दृष्टीने त्यांची तपासणी करुन त्यांना अग्निसुरक्षिततेच्या उपाययोजना सुचविल्या जातात.तदनंतर संबंधित नर्सिंग होम / क्लिनिकसाठी निर्धारित करण्यात आलेल्या अग्निसुरक्षेच्या उपाययोजनांची त्यांनी अंमलबजावणी केल्याबाबतची खातरजमा करुन त्यांना अग्निसुरक्षा अनुपालन प्रमाणपत्र दिले जाते.

माहे जानेवारी व फेब्रुवारी, २०२१ मध्ये एम/पूर्व विभागाचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांचेमार्फत प्राप्त ४१ नर्सिंग होमची बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत अग्निसुरक्षा व अग्निप्रतिबंधक दृष्टीने तपासणी करण्यात आली होती. तसेच नोंदणी न झालेल्या नर्सिंग होमची वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांचेमार्फत पाहणी केली जाते.

सदर नर्सिंग होम झोपडपट्टी सदृश परिसरात असून, नर्सिंग होम चालकांकडे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या इमारत बांधकाम विभागाकडून मंजूर आराखडा / वापरकर्ता बदल प्रमाणपत्र प्राप्त न झाल्यामुळे अग्निशमन विभागाकडून प्रमाणपत्र दिले जात नाही.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील आगीच्या घटना रोखण्याकरीता करावयाची कार्यवाही

**(२७)** * **८०१७२ श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.सुनील राणे (बोरीवली), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.संजय केळकर (ठाणे), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत मागील तीन वर्षात आगीच्या १३ हजार घटना घडल्या असून त्यात ६५ जणांचा दुर्दैवी मृत्यू व ४७३ जण जखमी झाले असल्याचे माहे जानेवारी, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनांमध्ये वाढ झाल्याने अग्निसुरक्षा तपासणीसाठी अग्निशमन दलाने गेल्या वर्षभरात ११३० इमारतींची तपासणी केली असता त्यामध्ये २७८ इमारतींमध्ये अग्निशमन यंत्रणा नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने या इमारतींना अग्निशमन विभागामार्फत नोटीसा बजावण्यात आल्या असून इमारतींमधील अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित न केल्यास वीज व पाण्याच्या जोडण्या कापण्याचा इशारा अग्निशमन दलाने दिला असल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अग्निमशन विभागाकडून इमारतींना केवळ नोटीस बजाविण्यापुरती कार्यवाही मर्यादित ठेवून त्याच्या अंमलबजावणीकडे मात्र विभागाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन आगीच्या घटना रोखण्यासह अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित करण्यासंदर्भात व संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) माहे जानेवारी, २०२३ ते डिसेंबर, २०२३ या कालावधीत बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत एकूण १२७० इमारतींची अग्निसुरक्षाविषयक तपासणी करण्यात आली. सदर तपासणीमध्ये २७८ इमारतींमधील आगप्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजनांमध्ये त्रुटी आढळून आल्या. सदर इमारतींमध्ये तपासणीअंती आढळून आलेल्या त्रुटींची विहित कालावधीत पूर्तता करण्यासाठी त्यांना महाराष्ट्र आगप्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ नुसार नोटीस बजावण्यात आल्या आहेत.

(३) हे खरे आहे.

(४) हे खरे नाही.

आगप्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजनांमध्ये त्रुटी आढळून आलेल्या २७८ इमारतीतील संबंधितांनी त्रुटींची पूर्तता केल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेस कळविल्यानंतर त्याची खातरजमा करुन घेण्यात आली आहे.

(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## माटुंगा (मुंबई) येथील महर्षी कर्वे उद्यानातील पाण्याच्या टाकीत बुडून दोन बालकांचा झालेला मृत्यू

**(२८) * ७९६०५ श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्रीमती मंजुळा गावीत (साक्री), अ‍ॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), अ‍ॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), अ‍ॅड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.योगेश सागर (चारकोप), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या निष्काळजीपणामुळे माटुंगा (मुंबई) येथील महर्षी कर्वे उद्यानातील (वन गार्डन) पाण्याच्या टाकीत बुडून दोन भावांचा मृत्यू झाला असल्याचे दिनांक १८ मार्च, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी महानगरपालिका व पोलीसांकडून चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशी अहवालाचे निष्कर्ष काय आहेत तसेच मृतांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत करण्याबाबत तसेच मुलांच्या मृत्यूस जबाबदार असलेल्या संबंधित अधिकारी व ठेकेदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी माटुंगा पोलीस ठाणे व बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आली आहे.

(३) सदर प्रकरणी उद्यान परिरक्षित करणाऱ्या कंत्राटदाराविरुध्द माटुंगा पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. १३२/२०२४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तसेच सदर प्रकरणी संबंधित बृहन्मुंबई महानगरपालिका अधिकाऱ्यांची चौकशी सुरु असून, चौकशीअंती दोषींवर योग्य ती नियमोचित कारवाई करण्यात येईल.

सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी सुमोटो जनहित याचिका क्र. २/२०२४ दाखल करुन घेतली आहे. मा.न्यायालयाच्या आदेशानुसार मृतांच्या पालकांना प्रत्येकी रु.५ लाख इतकी रक्कम नुकसान भरपाई म्हणून देण्याकरिता मा.उच्च न्यायालयात कंत्राटदारामार्फत रु.१० लाख इतकी रक्कम जमा करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खारघर (नवी मुंबई) येथील भगवती ग्रीन्स टॉवरच्या एफएसआयमध्ये मोठ्या प्रमाणात झालेला गैरव्यवहार

**(२९) * ७९५३० श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील खारघर सेक्टर-२३ येथील भगवती ग्रीन्स ३ या इमारतीतील तीन टॉवर मधील ७० ग्राहकांनी पैसे भरूनही त्यांना अद्याप घराचा ताबा देण्यात आला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पाचे बांधकाम अपूर्ण असल्याने भोगवटा प्रमाणपत्र (ओसी) अप्राप्त असताना सिडको अधिकारी आणि विकासक यांच्या संगनमतामुळे त्याच विकासकाला बांधकाम पूर्ण झाले म्हणून २७ कोटी रुपयांचा दंड माफ करुन शासनाचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान केल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या टॉवरच्या एफएसआयमध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाला असून १.५ एफएसआय लागू असताना भविष्यात ३.५ एफएसआय येणार हे गृहित धरुन सिडकोच्या नगररचना विभागाच्या संगनमताने विकासकाने अनधिकृतरित्या १४ हजार चौ. फूटाचे नियमबाह्यरित्या अतिरिक्त बांधकाम केले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सन २०१७ पासून या टॉवरचे बांधकाम सुरु झाल्यापासून विकासकाने सिडकोचे शहर विकास अधिकारी, वास्तुविशारद, इस्टेट आणि नगररचना विभागाच्या संगनमताने बांधकाम प्रमाणपत्र प्रलंबित ठेऊन, ग्राहकांनी पैसे भरल्यानंतरही अद्यापही घराचा ताबा दिला नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी करुन ग्राहकांना घराचा ताबा देण्याबाबत तसेच विकासक व संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे नाही.

मे.भगवती डेव्हलपर्स यांना निवासी व वाणिज्य वापरासाठी नवी मुंबई, खारघर, सेक्टर-२३, भूखंड क्र.३ वाटप करण्यात आला होता. सदर भूखंडाचा भाडेपट्टा करारनामा दि.२६.१०.२०१६ रोजी करण्यात आला आहे. सदर करारनाम्यानुसार ४ वर्षाचा बांधकाम कालावधी दि.२५.१०.२०२० पर्यंत वैध होता.तदनंतर सिडको संचालक मंडळाचा ठराव क्र.१२३३९ नुसार दि.२६.१०.२०२० ते दि.२५.७.२०२१ व ठराव क्र.१२२०९ व ११८८५ नुसार दि.२६.७.२०२१ ते दि.४.४.२०२२ पर्यंत पर्यावरण ना-हरकत दाखल मिळण्याकरिता झालेल्या विलंबाकरिता अतिरिक्त भाडेपट्टा शुल्क न आकारता बांधकामास मुदतवाढ देण्यात आली होती.

तदनंतर दि.५.४.२०२२ ते दि.४.४.२०२४ या कालावधीसाठी एकूण २७.३८ कोटी इतके अतिरिक्त भाडेपट्टा शुल्क परिगणित करण्यात आले होते. तथापि, नवी मुंबई जमीन विनियोग (सुधारीत) नियमावली, २००८ च्या विनियम ७ नुसार अतिरिक्त भाडेपट्टा शुल्क न आकारता दि.५.४.२०२२ ते दि.४.४.२०२४ या दोन वर्षाच्या कालावधीसाठी विकासकास बांधकाम मुदतवाढ दि.२५.९.२०२३ रोजी देण्यात आली व विकासकाने वाढीव कालावधीत बांधकाम पूर्ण केले आहे.

तदनंतर विकासकास विहीत पद्धतीने दि.१९.१०.२०२३ रोजी भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले आहे.

(३) हे खरे नाही.

सदर भूखंडाच्या मूळ चटई क्षेत्र निर्देशांक (एफ.एस.आय.) व्यतिरिक्त प्रिमियम एफ.एस.आय. नुसार ३३६०.५६ चौ.मी. व ॲन्सीलरी एफ.एस.आय. २२२६.९० करिता सुमारे रु.२.७७ कोटी अतिरिक्त भाडेपट्टा शुल्क आकारुन दि. ३१.१२.२०२१ रोजी ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आले आहे. सिडको महामंडळाच्या धोरणानुसार सदर बांधकामास ०२ वर्षाचा कालावधी आहे.

(४) हे खरे नाही.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर शहरातील रुग्णालयांच्या इमारतीमध्ये अग्निसुरक्षिततेच्या नियमांचे पालन होत नसल्याबाबत

**(३०) * ७९४४७ डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाने केलेल्या चौकशीअंती आपत्ती व्यवस्थापन आणि अग्निसुरक्षिततेच्या नियमांचे पालन न केल्याने १४२ रुग्णालय इमारती असुरक्षित असल्याचे घोषित केल्याची बाब माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील रुग्णालय चालकांना महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाने नोटीस बजावून अग्निसुरक्षा नियमांची तात्काळ अंमलबजावणी करण्याचे निर्देश देवूनही अद्यापही त्यांची अंमलबजावणी झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अग्निसुरक्षेअभावी रुग्णालयातील रुग्णांची सुरक्षितता धोक्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन रुग्णालयांतील अग्निसुरक्षा नियमांची अंमलबजावणी करणेबाबत तसेच दोषी रुग्णालय व्यवस्थापनांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे.

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) हे अंशतः खरे आहे.

अग्निशमन व आपात्कालीन सेवा विभागा मार्फत दि. ३१/०३/२०२४ पर्यंत शहरातील एकुण ३३५ रुग्णालय इमारतींना तात्पुरते आग संरक्षक मान्यता प्रमाणपत्र निर्गमित केले असुन त्यापैकी १२७ रुग्णालय मालक अथवा भोगवटदार यांनी अग्निशमन उपाययोजनांची पुर्तता करुन विभागातर्फे अंतिम आग संरक्षक मान्यता प्रमाणपत्र घेतलेले आहे. तसेच एकुण ६१ रुग्णालय इमारतीचे बांधकाम सद्य:स्थितीत निर्माणाधीन आहेत.

वरील इमारतीपैकी ज्यांनी महाराष्ट्र-आग प्रतिबंधक व जिवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ (सुधारणा २०२३) च्या अनुसुची १ व तात्पुरते आग संरक्षक मान्यता प्रमाणपत्रामधील अटीशर्तीचे पालन केले नाही अशा एकुण ७४ रुग्णालय मालक अथवा भोगवटदार यांच्या विरुद्ध महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ व सुधारित अधिनियम २०२३ च्या कलम ६ अन्वये अपर्याप्तता तथा उल्लंघन केल्याबाबत नोटीस बजावण्यात आले आहे.

त्यापैकी ज्यांनी कलम ६ नुसार दिलेले नोटीसचे अनुपालन केले नाही अशा एकुण ४५ रुग्णालय इमारत मालक तथा भोगवटदाराला अधिनियम २००६ व सुधारणा अधिनियम २०२३ च्या कलम ८(१) अन्वये धोकादायक इमातीतुन दुर निघुन जाण्याबाबत निर्देश दिले आहे.

त्यापैकी अधिनियमाच्या कलम ८(१)अन्वये धोकादायक इमारतीतुन दूर निघुन जाण्याबाबत निर्देश दिल्यानंतरही इमारतीचा ताबा किंवा तिचा भागामधुन किंवा इमारतीतुन दुर निघून न गेल्यामुळे अशा एकूण ३५ इमारत धारकाविरुद्ध अधिनियमाच्या पुढील कलम ८(२) (क) अन्वये विद्युत व पाणी पुरवठा खंडीत करण्याबाबत संबंधित प्राधिकरणाला नोटीसद्वारे निर्देश देण्यात आले आहे.

त्याचप्रमाणे अधिनियमाच्या कलम ८(२)ख अन्वये एकुण १० इमारती विरुद्ध इमारत धोकादायक असल्याने अशा जागेतुन त्या व्यक्तींना बाहेर काढण्याबाबत संबंधित पोलीस अधिकाऱ्याला कळविले व एकुण ०२ इमारतीविरुद्ध अधिनियमाच्या कलम ४० अंतर्गत न्यायालयीन प्रक्रीया सुरु करण्यात आलेली आहे.

तसेच अग्निशमन व आपत्कालीन सेवा विभागातर्फे ज्या रुग्णालय इमारत मालक किंवा भोगवटदार यांनी अग्निशमन विभागाचे तात्पुरते व अंतिम आग संरक्षक मान्यता प्रमाणपत्र न घेता इमारतीचा वापर सुरु केला आहे व अग्निशमन उपाययोजनांची पुर्तता केलेली नाही अशा रुग्णालय इमारतीविरुद्ध सुद्धा महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जिवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ व सुधारणा अधिनियम २०२३ च्या कलम ६ अन्वये एकुण १११, कलम ८(१) अन्वये एकुण ७३, कलम ८ (२) क अन्वये एकुण ३६, कलम ८(२) ख अन्वये एकुण १० रुग्णालय इमारतीविरुद्ध कार्यवाही करण्यात आलेली आहे.

अग्निशमन व आपात्कालीन सेवा विभागामार्फत दि. ३१/०३/२०२४ रोजी महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ व सुधारित अधिनियम २०२३ च्या विविध कलमा अंतर्गत केलेल्या नोटीस कार्यवाहीची दखल घेवुन ६६ + ६३ असे एकूण १२९ रुग्णालय इमारत मालक किंवा भोगवटदाराने अग्निशमन उपाययोजनांची पुर्तता केलेली आहे.

अग्निशमन विभागाने अधिनियमाअंतर्गत कार्यवाही केल्यानंतर बहुतांश रुग्णालय मालक अथवा भोगवटादाराने रुग्णालय इमारतीमध्ये महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ व सुधारित अधिनियम २०२३ च्या अनुसुची १ प्रमाणे अग्निशमन उपाययोजनांची पुर्तता केलेली आहे व काही रुग्णालयाने अग्निशमन उपाययोजना उभारण्याचे कार्य हाती घेतलेले आहे.

(४) अग्निशमन व आपात्कालीन सेवा विभागामार्फत महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ व सुधारित अधिनियम २०२३ अंतर्गत निरंतर कारवाई महापालिकेमार्फत करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१) (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.